म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 343
९८२१
REFBK-0001986
REFBK-0001986

ला पुष्प दुसरें !

# राष्ट्र-तिलक.



स्वराज्याचा झेंडा ऐसा उंच रोवा ।
सहज दिसावा स्वर्गी आम्हां ॥

लेखक व प्रकाशक–

**कल्लो कृष्ण जोशी चिकोडी.**

प्रिंटरः–दामोदर भिमराव कुलकर्णी यांनीं
कुलकर्णी प्रिंटिंग प्रेस निपाणी येथें छापिलें.

प्रथमावृत्ति ] [ शके १८४३

किं० ८२८६ ] सर्व हक्क स्वाधान. [ प्रति १०००

# उद्देश.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ॥
देह कष्टवीती उपकारें ॥

—तुकाराम.

महान् भगवद्भक्त, श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम इ० सत्पुरुषांनीं केवळ जगाच्या कल्याणासाठीं या भरतभूमीवर अवतीर्ण होऊन अजरामर कीर्ति संपादन केली; म्हणून त्यांच्या पवित्र नामाचा गजर भजनरूपानें अबालवृद्धांचे तोंडून अद्याप पावेतों अहोरात्र निघत आहे. त्याचप्रमाणें आधुनिक राष्ट्रभक्त शिरोमणि "**श्री लोकमान्य टिळक**" यांनीं राष्ट्राच्या उद्धारारासाठीं आणि जनतेच्या कल्याणासाठीं बिलक्षण स्वार्थत्याग करून, भयंकर संकटें सोसून, आपला देह खर्ची घातला; राष्ट्राला स्वतंत्रतेचा ( स्वराज्याचा ) खरा मार्ग दाखवून दिला त्या परमपूज्य राष्ट्रभक्ताचें नित्य स्मरण भजनरूपानें सर्वत्र सुरू होऊन त्यांनीं केलेल्या उपदेशामृताचें पान सर्व हिंदवासीयांनी नित्यशः नियमानें करून, पारतंत्र्य-पंकांत रुतलेल्या आपल्या हिंदमातेचा उद्धार करावा; हाच हेतु मनांत आणून "राष्ट्र पद्यमालेचें दुसरें पुष्प, **राष्ट्र-तिलक**" अभंगरूपानें वाचकांच्या हातीं देत आहे. वरील हेतु पूर्ण करणें हें सर्वस्वी वाचकांवर, विशेषतः टिळकभक्तांवर अवलंबून आहे. आणि तो तडीस जावो अशी बुद्धिदात्या परमेश्वराजवळ माझी प्रेमाची मागणी आहे.

पुस्तक कर्ता.

वन्देमातरम्.

राष्ट्रीय पद्यमाला पुष्प दुसरें.

# राष्ट्र-तिलक.

## अभंग १.

भालचंद्र लंबोदरा । राष्ट्रदेवा विघ्नहरा ॥ ध्रु० ॥
लोकमान्य-वरदायका । भावें वन्दू गणनायका ॥ १ ॥
नमो वाग्देवी शारदा । राही रसनाग्रीं सर्वदां ॥ २ ॥
लोकमान्यांच्या सद्गुणां । गाया मती दे कल्याणा ॥३॥

## अभंग २.

हिंदमाते हिंदमाते हिंद-राष्ट्रदेवते ॥
नमो नमो वेदविनुते, अमरवर-सुपूजिते ॥ ध्रु० ॥
शूलिनी, शालिनि, गदिनी, खड्ग चाप धारिणी ॥
पंकजाक्षि, पंकजवदने, (शंकरांक भूषिते) ॥ १ ॥
विश्वमोहिनी विश्वाक्षी, (विश्वरूप धारिणी) ॥
रक्तसुमन रक्ताभरणी, (दनुज रक्त चर्चिते) ॥ २ ॥

शिवा, तूंचि काली, दुर्गा तूंच हिंदवासिनी ॥
(हिंदपुत्र वरकल्याणी,) अंबिके स्वतंत्रते ॥ ३ ॥

## अभंग ३.

सांवळें तें रूप साजिरें गोजीरें ॥
पाही नेत्रभरें अंतर्यामीं ॥ धृ० ॥
अंतर्यामिं पाही लोकमान्य मूर्ती ॥
गाजे ज्यांची कीर्ती तीहीं लोकीं ॥ १ ॥
तीहीं लोकिं झाला वंद्य लोकमान्य ॥
केलें कुल धन्य जन्मोनीया ॥ २ ॥
जन्मोनीया केली भावें राष्ट्रसेवा ॥
स्वराज्याचा ठेवा प्राप्त व्हाया ॥ ३ ॥

## अभंग ४.

रूप सावळें गोमटें ॥ लाल मस्तकीं पागोटें ॥ धृ० ॥
अंगीं शुभ्र अंगरखा ॥ साधें उपरणें देखा ॥ १ ॥
गंध भाळीं उभा नाम ॥ जेवि शोभे मेघःशाम ॥ २ ॥
पायीं जोडा काठीं हातीं ॥ ऐशीं ध्यानीं आणा मूर्ती ॥३॥

## अभंग ५.

ज्ञानाचा भांडार मनाचा गंभीर ॥
धैर्याचा मंदार लोकमान्य ॥ धृ० ॥

निश्चयाचा मेरु दयेचा सागरु ॥
राष्ट्र–कर्णधारू लोकमान्य ॥ १ ॥
खरा वीतरागी खरा स्वार्थत्यागी ॥
खरा कर्मयोगी लोकमान्य ॥ २ ॥

## अभंग ६.

सुखदुःख मानी सम ॥ नाहीं देहासी आराम ॥ धृ० ॥
चंदनाचेपरी काया ॥ झिजवीली देशकार्या ॥ १ ॥
मनीं स्वदेश ! स्वदेश ! ॥ अनुदिनीं हाचि ध्यास ॥ २ ॥
व्हावें स्वदेशाचें हित ॥ जया चित्तीं हाचि हेत ॥ ३ ॥
सुप्तस्थिती घालवीली ॥ महाराष्ट्राची सगळी ॥ ४ ॥
बोध–पीयूष पाजून ॥ केले आपुलेसें जन ॥ ५ ॥

## अभंग ७.

धरि कदां न मानसिं हेवा; केली सेवा राष्ट्राची ॥ धृ० ॥
सोसुनि नोकरशाही त्रासा बंदिवासा भोगोनी ॥ १ ॥
देशासाठीं सहावर्षे राही हर्षे मंडालीं ॥ २ ॥
लिहिलें रहस्य भगवद्गीता; तारी जगता जें बोधें ॥ ३ ॥
देशोन्नतिची मंदज्वाला, फिरुनी तिजला चेथविली ॥ ४ ॥
केली स्वराज्य मिळण्यासाठीं चळवळ मोठी चोहिंकडे ॥५॥

## अभंग ८.

लोकमान्या ऐसें व्हावें ॥ तेणें स्वार्थाते त्यागावें ॥ धृ० ॥
भेदभावा विसरावें ॥ लोक आपुलेसें करावें ॥ १ ॥
देशकार्य पोटासाठीं ॥ करूंनये आटाआटी ॥ २ ॥
सत्य वाचेनें बोलावें ॥ आत्मकर्तव्या जाणावें ॥ ३ ॥
कर्म करावें निष्काम ॥ हेंचि रहस्याचें वर्म ॥ ४ ॥
लोकमान्यांचें हें व्रत ॥ चालवावें अव्याहत ॥ ५ ॥

## अभंग ९.

चतु:सूत्री घ्यावें व्रत ॥ तेणें सोसावे आघात ॥ धृ० ॥
ऐषआरामा त्यागावें ॥ संकटासी नच भ्यावें ॥ १ ॥
जाच झाला अनिवार ॥ तरी सोडूंनये धीर ॥ २ ॥
अंगीं निश्चय बाणावा ॥ कर्मयोग तो साधावा ॥ ३ ॥
कार्य केल्याविणें बोल ॥ बोलोनये गर्वें फोल ॥ ४ ॥
लोककल्याणाचें काज ॥ करण्या धरूंनये लाज ॥ ५ ॥
लोभीं गुंतूं नेदी मन ॥ हीच टिळकांची शिकवण ॥६॥
जया बाणेना हें अंगीं ॥ तेणें राहावें घरीं उगी ॥ ७ ॥

## अभंग १०.

सफल तो जन्म तरीच म्हणावा ॥
घडे ज्यांस सेवा स्वदेशाची ॥ धृ० ॥

काव्य. ६२१



शिणविली माय व्यर्थ नाहीं तरी ॥
भार भूमीवरी पशू ऐसा ॥ १ ॥
नाहीं दानधर्म केलें राष्ट्रकाज ॥
नाहीं आर्यतेज दाखवीलें ॥ २ ॥
परें गांजीयेली पूज्य हिंदमाता ॥
खेद जया चित्ता वाटेनाची ॥ ३ ॥
कुटुंब पोषणाविणें आन कांहीं ॥
नेणें; तया पाही नरकवास ॥ ४ ॥

## अभंग ११.

करा एकी करा एकी ॥ नको मत्सराची बेकी ॥ धृ० ॥
उच्चनीच भेदभावा ॥ देशकाजीं ठाव न द्यावा ॥ १ ॥
श्रेष्ठ नोहे तो ब्राह्मण ॥ जनां नेदी विद्यादान ॥ २ ॥
नव्हें क्षत्रिय तो जाण ॥ देशासाठीं नेदी प्राण ॥ ३ ॥
म्हणोंनये वैश्य त्यासी ॥ विके विदेशी मालासी ॥ ४ ॥
झाला पराव्यांचा दास ॥ शूद्र म्हणोंनये त्यास ॥ ५ ॥
श्रेष्ठ म्हणावें कीं तया ॥ देशासाठीं झिजवी काया ॥६॥

## अभंग १२.

राष्ट्रकाजीं वेंची धन ॥ तोचि म्हणावा धनवान ॥ धृ० ॥
छदामासी नेदी कदां ॥ काय जाळावी संपदा ॥ १ ॥
राष्ट्रभक्तांचें दर्शन ॥ ध्याया लज्जा पावे मन ॥ २ ॥
जाई वरिष्ठा शरण ॥ पदवीसाठीं अर्पी धन ॥ ३ ॥
देशभक्तांची चहाडी ॥ सांगे वरिष्ठासी प्रौढी ॥ ४ ॥
देशद्रोहींचे शेजारा ॥ नका राहूं दूर सरा ॥ ५ ॥

## अभंग १३.

पाडी बोथाचा पावूस ॥ नसे अंतरीं लवलेश ॥ धृ० ॥
नका चहा घेऊं बोले ॥ स्वयें झोडीतसे प्याले ॥ १ ॥
म्हणे विदेशी साखर ॥ सोडा; स्वयें खाई खर ॥ २ ॥
स्वयें विदेशी वस्त्रानें ॥ नटे; लोकां नध्या म्हणे ॥ ३ ॥
ऐसे भोंदू ढोंगी जन ॥ न ते राष्ट्राचे धुरीण ॥ ४ ॥

## अभंग १४.

डळमळीत केला नोकरशाही किल्ला ॥ धृ० ॥
चढवुनि हल्ला बुद्धी–शस्त्रें ॥ १ ॥
देशी चळवळ आणि बहिष्कार ॥
केला भडिमार तोफांचा या ॥ २ ॥

राष्ट्रीय, प्रांतीक, जिल्हा परिषदें ॥
प्रतिपक्षि प्यादें पळवीलें ॥ ३ ॥
निश्चयाचा वेळू रोवि तयावरी ॥
लाविली फरारी स्वराज्याची ॥ ४ ॥

---

**–राजद्रोहाच्या आरोपावरून शिक्षा झाली त्या वेळीं लोकमान्यानीं दाखविलेलें धैर्य, निश्चय, करारीपणा आणि निर्भयपणा–**

**अभंग १५.**

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क ॥
मागोनीया भीक न मिळेची ॥ धृ० ॥
आजवरी केली बहु विनवणी– ॥
केली हेटाळणी सत्ताधीशें ॥ १ ॥
स्वराज्याचा अर्थ नव्हें आंग्ल हेवा ॥
प्रजाहक्क व्हावा प्राप्त हाची ॥ २ ॥
तयाचीये सांठीं करणें उपाव ॥
न हो राज्यद्रोह अणुमात्र ॥ ३ ॥

म्हणोनी निःशस्त्र प्रतिकार केला ॥
स्वदेशीव्रताला स्वीकारीलें ॥ ४ ॥

## अभंग १६.

नाहीं आम्हां भीती आम्हीं राष्ट्रदास ॥
सोसू बंदिवास आनंदानें ॥ धृ० ॥
देशासाठीं देऊं प्रिय पंचप्राण ॥
गृह पुत्रधन कोण गणी ॥ १ ॥
कारागृह आम्हां वाटे रंगमहाल ॥
तेथील ते हाल स्वर्गसुख ॥ २ ॥
आहार तेथीचा जरी तें कदान्न ॥
पंचपक्वान्न मानू तयां ॥ ३ ॥
साडेतीन वस्त्रें प्रावर्ण घोंगडी ॥
आम्हां शालजोडी भरजरीची ॥ ४ ॥
पायीच्या शृंखळा वाजे खळखळा ॥
राष्ट्रसंत–मेळा नाचे मोदें ॥ ५ ॥
नाहीं सुखासाठीं आमुचें जीवन ॥
राष्ट्राचें कल्याण हेंची सूख ॥ ६ ॥

## –लोकमान्यानीं देशभक्तांचा केलेला गौरव, सौजन्य आणि निगर्वीपणा–

### अभंग १७.

तुम्हीं राष्ट्रसंत दास मी तुमचा ॥
न पुरे ही वाचा वानावया ॥ धृ० ॥
नाहीं थोरपण राष्ट्रसेवा केली ॥
इच्छा प्रेरीयेली विश्वंभरें ॥ १ ॥
थोरवी देवोनी मज गौरवीले ॥
कार्य करवीलें माझ्या हातें ॥ २ ॥
देशभक्त तुम्हीं तुमचेंचि साह्य ॥
एकला मी काय करूं जाणे? ॥ ३ ॥

---

## –लोकमान्यांची परमेश्वराजवळ निःस्वार्थ मागणी–

### अभंग १८.

देणें तरी देई हेंचि दान देवा ॥
घडो देशसेवा जन्मोजन्मीं ॥ धृ० ॥

नाहीं मज आशा वैकुंठपदाची ॥
स्वतंत्रता हाची मोक्ष माझा ॥ १ ॥
पूर्ण तें स्वराज्य देई हिंदुस्थाना ॥
असे ही प्रार्थना चरणीं तुझ्या ॥ २ ॥
सदां घडो राष्ट्र–भक्तांचा सहवास ॥
पुरवावी आस देवराया ॥ ३ ॥

## लोकमान्यांची आरती.

[ चा०—आरती ज्ञानराजा. ]

आरती लोकमान्या ॥ कर्मयोगीराज धन्या ॥
प्रसवली पूज्य माता ॥ नाहीं पारावार पुण्या ॥ धृ० ॥
मायीक नटवेषें ॥ जन भुलोनिया गेलें ॥
असोनि सिंहछावा ॥ निजरूपा विसरले ॥
पटविली खूण बोधें ॥ तुंवा विबुधवरेण्या ॥ १ ॥
पारतंत्र्य हिंददेशा ॥ पूर्ण स्वातंत्र्य द्याया ॥
अवतार रामदास ॥ बाळ नामाभिधान ॥
कल्याण लागे पायीं ॥ तुजवीणें नच अन्या ॥ २ ॥

## भजन.

जयजय कर्मराज योगी ॥ जयजय लोकमान्य योगी ॥१॥

 काव्य ६२१

## लोकमान्य मुंबई मुक्कामीं अजारी पडलेवेळीं देशभक्तांना केलेला शेवटचा उपदेश

### अभंग १.

तुम्हीं देशभक्त देशोन्नतीसाठीं ॥
आलां हिंदपोटीं जन्मोनीया ॥ धृ० ॥
देशसेवा हाची तुम्हां परमार्थ ॥
नाहीं दुजा स्वार्थ याचांचोनी ॥ १ ॥
सोसीयलें दुःख तुम्हीं मजसंगें ॥
झिजवोनि अंगें साह्य केलें ॥ २ ॥
राहीलें अपूर्ण राष्ट्र-कार्य माझें ॥
करा पूर्ण; ओझें तुम्हांवरी ॥ ३ ॥
व्रत सांग होतां करा उद्यापन ॥
स्वराज्यनिशाण लावा वेगीं ॥ ४ ॥
स्वराज्याचा झेंडा ऐसा उंच रोवा ॥
सहज दिसावा स्वर्गीं आम्हां ॥ ५ ॥
हेंचि अखेरीचें सकळां सांगणें ॥
याहुनी मागणें अन्य नाहीं ॥ ६ ॥
असो सकळांसी माझा प्रणीपात ॥

जोडोनीया हात अखेरीचा ॥ ७ ॥

मंदावली वाणी खुंटलें बोलणें ॥

आलें बोलावणें देवलोकीं ॥ ८ ॥

करा जयजयकार बोला हिंदमाता ॥

निरोप द्या आतां अखेरीचा ॥ ९ ॥

---

## -लोकमान्य निधन-विलापलहरी-

### अभंग २.

थोर ती पुण्याइ सरदारगृहाची ॥

घडे टिळकांची अंत्यसेवा ॥ धृ० ॥

सेवा अखेरीची घडे जयांजयां ॥

नाहीं तयां भाग्या पारावार ॥ १ ॥

एकोभावें केली स्वयंसेवकांनीं ॥

सेवा रात्रंदिनीं टिळकांची ॥ २ ॥

### अभंग ३.

देशी आंग्लवैद्यें केला उपचार ॥

औषधें अपार देवोनीया ॥ धृ० ॥

केला बहु यत्न उपशम व्हाया ॥

परी देवराया नावडेची ॥ १ ॥
होतीं मनीं आशा पडेल आराम ॥
राष्ट्राचें दुष्कर्म ओढवलें! ॥ २ ॥
ओढवलें कर्म झाला सन्निपात ॥
झाला राष्ट्रघात! अखेरीस ॥ ३ ॥
नाहीं दया आली निर्दय काळाला! ॥
लोकमान्यबाळा नेलें! शेखीं ॥ ४ ॥

## अभंग ४.

गेला अंतरात्मा देहासी त्यजोनी ॥
झाली अचेतनी जड काया ॥ धृ० ॥
हांहां म्हणतांची पसरली मात ॥
पातले समस्त नागरीक ॥ १ ॥
झाली बहु दाटी पहातां पहातां ॥
भरोनीया रस्ता लोक चाले ॥ २ ॥
हाहाःकार! नादें कोंदलें अंबर ॥
शोकाचा सागर उचंबळें! ॥ ३ ॥
नाहीं रीग जाया सरदारगृहांत ॥
भारें इमारत पडो पाहे ॥ ४ ॥

नायकिती लोक; नुरें देहभान ॥
टिळक दर्शन घ्याया धांवे ॥ ५ ॥
समुदाय मोठा गृह तें लहान ॥
शिरूं पाहे जन चेंदामेंदी ॥ ६ ॥
महात्मा गांधींजी आणि केळकरें ॥
समजाविलें बरें सकळींकां ॥ ७ ॥
नका करूं ऐसें आयका विनंती ॥
वेळ असे रात्री अंधेरींची ॥ ८ ॥
सकळां सहज होईल दर्शन ॥
ऐसें करूं जाणा उदईक ॥ ९ ॥
तोंवरी धरावा धीर सकळींकें ॥
आयकिलें लोकें गेले धामा ॥ १० ॥

## अभंग ५.

सरली काळमुखी यामिनी ॥ आला उदया वासरमणी ॥
आलें लोक तदां धावुनी ॥ दर्शन घेण्या टिळकांचें ॥धृ०॥
शोकें अंबर कोंदाटलें ॥ हा! हा! लोकमान्य संपले! ॥
अश्रूनीर पूर लोटले ॥ रडती कंठ मोकलोनी ॥ १ ॥
कैसें केलें नारायणा! ॥ आली नाहीं तुला करुणा ॥

नेला अमुचा राजसराणा ! ॥ अनाथ करुंनी आह्मांसी ॥२॥
हां! हा! लोकमान्य टिळका ॥ हा! हा! राष्ट्रसूत्रचालका ॥
हां! हा! राष्ट्रबंधमोचका ! ॥ कैसा जासी टाकोनी ॥३॥
पुण्याचें पुण्य आज संपलें ! ॥ काळें येथ तुम्हां आणिलें ॥
उघडें राष्ट्र अहा! पडलें ! ॥ फुटलें दैव देशाचें ॥ ४ ॥

## अभंग ६.

धन्य मुंबापुरी चौपाटी ती धन्य ॥
देह लोकमान्य ठेवीयेला ॥ धृ० ॥
नव्हें तें स्मशान; आरामाचें स्थान ॥
मिळे कोणांही न आजवरी ॥ १ ॥
थोर ती पुण्याई झालें पुण्यस्थान ॥
केलें तें पावन लोकमान्यें ॥ २ ॥
लोकवंद्य क्षेत्र परम पवित्र ॥
टिळकचरित्र अगाधची ॥ ३ ॥

## अभंग ७.

केला चितेचा पाळणा ॥ पहुडवीला बाळराणा ॥ धृ० ॥
घाली अग्नीची ओढणी ॥ लावी वायूची काडणी ॥ १ ॥
झोके भडकल्या ज्वाळा ॥ नभोमंडला भिडाल्या ॥ २ ॥

बाळ दिसेना पालख ॥ क्षणामाजीं झाली राख ॥ ३ ॥
हिंदमातेचा सुपुत्र ॥ गेला! गेलाहो! परत्र ॥ ४ ॥

**अभंग ८.**

देह भस्मीभूत झाला ॥ आत्मा चैतन्यीं मिळाला ॥ धृ०॥
तत्वीं तत्व तें मिळालें ॥ वपू रक्षारूपीं झालें ॥ १ ॥
आतां कैंचें तें दर्शन! ॥ देह झाला विसर्जन ॥ २ ॥
चोहोंकडे हा: हा:कार! ॥ वाहे दु:खाश्रूंचे पूर ॥ ३ ॥
हाय! हाय! लोकमान्य! ॥ गेले! झालें जगत्शून्य! ॥४॥

---



—आपणाला परवशतेच्या जाचांतून सोडविण्या-
साठीं भयंकर संकटें सोसून, निस्वार्थपणानें
अव्याहत प्रयत्न करणाऱ्या, आपल्या प्रिय
पुत्राच्या ( लो० टिळकांच्या ) निधनानें
आश्रयहीन झालेल्या दुर्दैवी
हिंदजननीचे दुःखोद्गार—

पद [ चा०— अजि अक्रुर हा नतो ]

सि बोलकिरे ! बोल ! सख्या लडिवाळा ! ॥
लोकमान्य राजस बाळा ! ॥ धृ० ॥
ी तव वाणी पडतां अरिच्या श्रवणीं ॥
हृदयाचें होई पाणी ॥

तीं आज अहा! होई कीं निर्वाणी! ॥
ही झोप किंवा ग्लानी! ॥ चाल ॥
सावध हो; उघडी डोळे ॥
मजकडे पहा; मन भ्यालें! ॥
तुज भेटाया जिवलग गांधी आला ॥
त्या सवें बोल हित बोला ॥ १ ॥
हा बंधु तुझा दुसरा लजपत राय ॥
जो करी सदा तुज साह्य ॥
हे मौलाना–बंधू करिती हाय! ॥
यां सवें न बोलसि काय! ॥ चाल ॥
त्या परी सकल अनुयायी ॥
पातले त्यांकडे पाही ॥
सदुपाय कथीं राष्ट्रहिताचा सकळां ॥
लोकमान्य राजस बाळा ॥ २ ॥
छे! झोंप नव्हें; ग्लानी ही काळाची– ॥
झांपडी पडे शेवटची! ॥
मज भुरळ पडे लहर शिरे वेडाची ॥
वरळते उगिच भलतेंची ॥ चाल ॥

निश्वसन बंद हे झाले! ॥
कायमचे डोळें मिटलें! ॥
हा हाय! अहो! राष्ट्र–सूर्य मावळला! ॥
प्रियबाळ–टिळक अंतरला! ॥ ३ ॥
हतदैवा मी! काय असें हें झालें? ॥
आकाश शिरीं कोसळलें! ॥
या काळाचें कठोर हृदय न द्रवलें! ॥
कळवळे न; मी तळमळले! ॥ चाल ॥
जाऊं मी कोणा शरण! ॥
देईल कोण सुत–दान? ॥
जरी आक्रोशें रडले फोडुनि टाळा! ॥
येईल कोण? या वेळा ॥ ४ ॥
हा बाळ नव्हें; काळ अरीचा होता ॥
दुष्टांचा शासनकर्ता ॥
जो दिनरजनीं वाही माझी चिंता! ॥
मनिं भावी दैवत माता ॥ चाल ॥
मी आतां उघडी पडले! ॥
स्वातंत्र्य–सुखा आंचवले! ॥

हो परवशता संतत जाळी मजला ! ॥
सोडविता आतां नुरला ! ॥ ५ ॥
दिन कंठियले दुःसह–कारागारीं ! ॥
मजसाठीं शिणला भारी ! ॥
नच भोगियलें सौख्य मुळीं संसारीं ! ॥
तनु मदर्थ झिजवी सारी ! ॥ चाल ॥
मी झाले आतां दुबळी ! ॥
आशेची झाली होळी ! ॥
प्रिय बाळानो ! काय करूं मी ? बोला ! ॥
तुम्हि तरी मला सांभाळा ! ॥ ६ ॥

---

## प्रिय पुत्राच्या विरहानें दुःखाकुल झालेल्या हिंदमातेचें (महात्माजींनीं केलेलें) शांतवन व परवशतेच्या जाचांतून हिंदमातेला सोडविण्याची महात्माजींची भीष्मप्रतिज्ञा !!

**पद** [ चा०— भूपती खरे ते ]

रडुं नको ! नको करुं शोक ! आतां भूमाते ॥
जाहलें वदन हें विकल पहा आकांतें ! ॥ धृ० ॥
कां म्हणसी ? माते ! टिळक टाकुनी गेला ! ॥
मी असतां सन्निध सादर तव सेवेला ॥
प्रिय टिळक न गेला, समज गांधिजी गेला ॥
नरवीर—केसरी उभा पुढें तव ठेला ॥ चाल ॥
कां म्हणसी ? आश्रयहीना ! ॥ आपणा ॥
का म्हणसी ? झाले दीना ! ॥ आपणा ॥
कां म्हणसी ? दुबळी खिन्ना ! ॥ आपणा ॥
ही पहा प्रतिज्ञा करितो शिवुनि पदांते ॥
परवशा—शृंखला तोडिन माझ्या हातें ॥ १ ॥

दा. क. ......

मज साह्य कराया सिद्ध बंधु हे असती ॥
यां सवें करिन मी जननी! इच्छा पूर्ती ॥
टिळकांचा आत्मा देईल मजला स्फूर्ती ॥
वाजवीन नौबत गाउनि बलवत्कीर्ती ॥ चाल ॥
दावीन आत्मबल माझें ॥ शत्रुला ॥
जिंकीन याच बल-तेजें ॥ शत्रुला ॥
आणीन शरण निज ओजें ॥ शत्रुला ॥
लावीन ध्वज चिर फडकत राहिल वातें ॥
देईन शांति चिर लोकमान्य-आत्म्याते ॥ २ ॥
मज शस्त्रांस्त्रांची नसे गरज तोफांची ॥
निःशस्त्र उपायें हरिन शक्ति परक्यांची ॥
वाक्सामर्थ्यानें असहकार-तत्वाची ॥
राष्ट्रीय सभेची संमति घेईन साची ॥ चाल ॥
चहुंकडे तंतु-चक्रांसी ॥ ठेवुनी ॥
काढवीन वसनें देशी ॥ विणवुनी ॥
देईन विदेशी-वस्त्रां ॥ फेंकुनी ॥
वापरीन खादी सूत काढुनी हातें ॥
लववीन सकळां; पाजुनि बोध-सुधेते ॥ ३ ॥

यापायीं दुरितें जरी मजवरीं आली ॥
जरि सत्ताधीशें दुःसह छलना केली ॥
कथुं काय फार? ही काया जरि हत झाली ॥
तरि ढळे न निश्चय पुरविन इच्छा सगळीं ॥ चाल ॥
तव वरद–हस्त शिरिं ठेवो ॥ माउली ॥
कारुण्य–दृष्टिनें पाही ॥ माउली ॥
मिळवीन विजय लवलाही ॥ माउली ॥
धरि धैर्य; नको करुं चिंता; त्यजि शोकातें ॥
स्वातंत्र्य–सुखासनिं बसविन निश्चित तूतें ॥ ४ ॥

ॐ तत्सत्

**श्रीलोकमान्यचरणार्पणमस्तु.**

**समाप्त.**

REFBK-0001986
REFBK-0001986

# राष्ट्रीय पद्यमाला.

पुष्प पहिलें

जय वाणीः–(आवृत्ति दुसरी) किं० ८१ आ०

पुष्प दुसरें

राष्ट्र–तिलक (सचित्र):–किं० ८२॥ आ०

८४ आण्याची पोष्ट टिकिटें पाठविलेस

दोनी पुस्तकें बु० पो० नें पाठवूं.

पुष्प तिसरें

**हिंदमाता.**

येत्या दीपावळीस प्रसिद्ध होईल.

**के. के. जोशी, पो. चिकोडी** (बेळगांव).

---

लोकमान्य

# टिळक पेय.

हें पेय, शास्त्रोक्त पद्धतीनें तयार केलें असून ह्यांत अनेक वनस्पतीचें मिश्रण असल्यानें अत्यंत स्वादिष्ट व पौष्टिक आहे. हें दररोज घेत गेल्यानें चहापासून झालेला वाईट परिणाम नाहींसा होऊन प्रकृति सुदृढ बनते; आणि चहाचें दुर्व्यसन अजीबात सुटतें! एकवार अनुभव घ्या; ह्मणजे खात्री होईल. किंमतः— पाव रत्तलच्या डब्यास ८६ आ० व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन मिळेल.—एजंट पाहिजेत.

**पत्ताः—के. के. जोशी आणि मंडळी, टिळकपेय-आफीस पो० चिकोडी,** [बेळगांव].



ही पहा: प्रतिज्ञा करितो शिवुनि पदांतें ॥
परवशा-शृंखला तोडिन माझ्या हातें ॥ १